# बुध्दं शरणं गच्छामि - भाग ३

**दि. ९ नोव्हेंबर - दिवस ६ वा**

नेपाळहून निघून पुन्हा नेपाळ आणि भारतात इमिग्रेशन करून कुशीनगरला १ वाजेपर्यंत पोचायचा प्लॅन होता. पण भारतात परदेशी गेस्टचे इमिग्रेशन होताना २ तास उशीर झाला आणि आम्ही साडेतीन वाजता जेवणासाठी हॉटेलमध्ये पोचलो. सर्व archeological साईट्स सूर्यास्ताला बंद होतात आणि आज सूर्यास्त ५:०५ ला होता. म्हणून भराभर जेवून आम्ही सव्वाचारला महापरिनिर्वाण मंदिरात पोचलो.




कुशीनगर हे बुध्दाच्या जीवनातील चौथे महत्वाचे ठिकाण. ह्या ठिकाणी त्याचे महापरिनिर्वाण झाले. निर्वाण म्हणजे नुसता मृत्यू नाही तर मोक्षासह मृत्यू. हा मृत्यू ती व्यक्ती कुठे होणार, कधी होणार हे स्वतः ठरवते. त्याप्रमाणे बुध्दाने कुशीनगर ही जागा त्यासाठी ठरवली. त्याचा जन्म दोन साल वृक्षांच्या मध्ये झाला, तसाच मृत्यूही दोन साल वृक्षांच्या मध्ये झाला. वर्षावासासाठी वैशाली नगरीत असलेला बुध्द २५० किमी पायी चालत कुशीनगर मध्ये आला. ज्या दिवशी परिनिर्वाण होणार होते त्या दिवशी तो २ साल वृक्षांच्या मध्ये उजव्या कुशीवर पहुडला.



साल वृक्ष

त्याचे डोके उत्तरेला, पाय दक्षिणेला तर चेहरा पश्चिमेला होता. नंतर तो ध्यानात गेला. ध्यानाच्या चार अवस्था पार करून तो पुन्हा उलट्या क्रमाने नॉर्मल स्थितीत आला आणि मग पुन्हा ध्यानाच्या चौथ्या अवस्थेत जाऊन तो निर्वाणात गेला. शेवटी त्याने उपदेश केला की सर्व भौतिक गोष्टी ह्या नष्ट होणार आहेत तेव्हा कोणत्याही गोष्टीच्या मागे न लागता आपले कर्तव्य करा, तोच तुमच्या मोक्षाचा मार्ग असेल.



Votive स्तूप

बुध्दाच्या मृत्यूनंतर त्याचे दहन केले गेले. त्याच्या अस्थींचे ८ भाग करून वेगवेगळ्या ठिकाणी त्यावर स्तूप उभारण्यात आले. त्यानंतर अशोकाने ७ स्तुपांमधील अस्थी ८४००० भागांत विभागून तेवढे स्तूप बांधले. महापरिनिर्वाण झालेल्या जागी असाच एक स्तूप होता. ६.१ मीटर उंचीची कुशीवर झोपलेली बुध्दमूर्ती आणि इतर अनेक विहार होते. हा परिसर सुध्दा बखतीयार बिन खिलजीने नष्ट केला. नंतर ५०० वर्षे तो पूर्णपणे विसरला गेला. पण फा हीन ह्या चिनी प्रवाशाने त्याचे वर्णन लिहून ठेवले होते. त्यावरून Alexander Cunningham ह्याने कुशीनगर ह्या ठिकाणी उत्खनन सुरू केले आणि ही बुध्दमूर्ती आणि त्या परिसराचे अवशेष मिळाले. दोन साल वृक्षांच्या जागेत बुध्दमूर्ती होती, तर तिच्यामागे रेलिक - स्तुपाचे अवशेष होते. तेथे तांब्याच्या पात्रात रेलिक (बुध्दाचे शारीरिक अवशेष) सुध्दा होते हे त्यावरील कोरीव मजकुरावरून समजले. आता भारत सरकारने त्याच्या बाहेरून स्तूप बांधला आहे आणि त्याच्याच पुढे महापरिनिर्वाण मंदिर बांधले आहे. त्या मूर्तीला कमळाची फुले किंवा पिवळी शाल वाहतात. ६.१ मीटर लांबीची ही मूर्ती गुलाबी सँडस्टोन मध्ये बनवलेली आहे.



परिसरात अनेक इमारतींचे पायाचे भाग आहेत, मंदिराच्या चारी बाजूंनी अनेक votive स्तूप आहेत.




बुध्दाच्या दहनाच्या जागी असलेला स्तूप - हाही खूप मोठा आहे. तोही नष्ट करण्याचा प्रयत्न झाला पण खूपच मोठा असल्याने अजून बराच भाग चांगल्या अवस्थेत आहे. दोन्ही परिसरांत सूर्यास्ताच्या आधी प्रवेश करण्यात आम्ही यशस्वी झालो. पण आणखी जास्त वेळ मिळाला असता तर बरे झाले असते. ह्या स्तूपाच्या जवळही अनेक votive स्तूप आहेत. ह्यालाही कमळे वाहतात. मेणबत्त्या लावतात.

**दि. १० नोव्हेंबर दिवस ७ वा**

९ तारखेला रात्री कुशीनगरहून गोरखपूरला येऊन तिथून आम्ही पहाटे बलरामपूर स्टेशन वर उतरलो. नंतर एका हॉटेलमध्ये ब्रेकफास्ट करून बसने श्रावस्तीला गेलो. श्रावस्ती हे बुध्दाच्या काळात खूप मोठे आणि महत्वाचे शहर होते. त्याच्या चारी बाजूंनी उंच भिंती होत्या. एकूण २५ चौ. किमी परिसरात हे शहर पसरलेले होते. हे सुध्दा बखतीयार खिलजीने नष्ट केले. मात्र हे फक्त बुध्दिझमच नाही तर जैन आणि सनातन धर्मियांचे सुध्दा महत्वाचे स्थान होते. Hyu en tsang च्या वर्णनावरून Alexander Cunningham ने येथे उत्खनन सुरू केले तेव्हा अजूनपर्यंत दोनच बुध्दिस्ट इमारती सापडल्या आहेत. १. कच्ची कुटी २. अंगुलीमाला गुहा



कच्ची कुटी - बुध्दाला ज्ञानप्राप्ती झाली होती पण संघ खूप वाढला नव्हता त्या काळात अनाथपिंडद ह्याने बुध्दाला राहण्यासाठी एक विहार बनवला. तो आधी गवत वगैरे वस्तूंनी बनवला होता म्हणून म्हणून त्याला कच्ची कुटी म्हणतात. नंतर तो अधिकाधिक पक्का होत गेला. पण नाव तेच राहिले. आता तो विटा आणि दगडांनी बनलेला आहे.



अंगुलीमाला गुहा - अंगुलीमाला हा एक लुटारू होता. खरे तर उत्तर कोसलचा सम्राट प्रसेनजीत (ज्याची श्रावस्ती राजधानी होती) ह्याच्या बरोबर तो तक्षशिला युनिव्हर्सिटी मध्ये शिकला होता. पण काही मतभेद होऊन तो लुटारू बनला. तो लोकांना नुसते लुबाडतच नसे तर ठार मारून त्यांच्या उजव्या हाताची करंगळी कापून घेत असे. अश्या करंगळ्या माळेत ओवून ती माळ तो गळ्यात घालत असे. लोकांनी बुध्दाला विनंती केली की त्याच्यापासून आम्हाला वाचवा. तेव्हा बुध्द त्याच्या वाटेवरून जात असताना त्याने बुध्दाला घाबरवण्याचा प्रयत्न केला. पण बुध्दा धीरगंभीरपणे चालतच राहिला.
ह्यामुळे त्याचे मन परिवर्तन झाले आणि तो बुद्धाचा अनुयायी बनला. पण तो आधी हिमालयाच्या गुहेत राहत होता म्हणून त्याच्यासाठी श्रावस्ती मध्ये जो विहार बांधला त्यात गुहेसारखी जागा तयार केली आहे. ह्या दोन्ही इमारती बऱ्याच चांगल्या स्थितीत आहेत. ह्या परिसरात अनेक उंचवटे आहेत त्याखाली अजूनही खूप काही सापडेल. अजून उत्खनन पूर्ण झाले नाहीये.

जेतवन -

पुरातन श्रावस्ती शहराबाहेर जेतवन ही १ चौ. किमी परिसरात पसरलेली बाग आहे. अनाथपिंडद ह्याने बुध्दाला पावसाळ्यात ४ महिने राहण्यासाठी ही दान केली. बुध्दाने येथे एकूण २४ वेळा पावसाळ्यात वास्तव्य केले.

जेव्हा संघ मोठा झाला तेव्हा बुध्दाच्या अनुयायांनी ठरवले की आपण एक आंब्याची बाग बुध्दाला दान द्यावी. ही बाग प्रसेनजीत ह्याचा भाऊ जेतकुमार ह्याची होती. पण तो बुध्दाला मानत नव्हता. त्याने सांगितले की ह्या बागेच्या जमिनीवर प्रत्येक ठिकाणी सोन्याची नाणी लावली तर तेवढी नाणी घेऊन मी ही विकेन. तेव्हा अनाथपिंडद ह्याने आपली पूर्ण प्रॉपर्टी विकून तेवढी नाणी मिळवली आणि ती बाग विकत घेतली.

त्यात सुध्दा अनेक इमारती आहेत
१. मूलगंध कुटी - इथे श्रावस्ती मध्ये असताना बुध्द राहत असे.



२. अनाथपिंडद विहार आणि त्याचे सोन्याचे दागिने बनवण्याचे ठिकाण.

ह्याच ठिकाणी बुध्दाच्या निर्वाणानंतर आनंदा ह्याने बोधी वृक्षाची फांदी लावली. तो वृक्ष अजूनही आहे.



मूलगंध कुटीच्या समोर भिक्खू संघाला राहण्यासाठी खोल्या आणि प्रवचनासाठी चौथरा आणि त्याच्या बाजूला भिक्षुंना बसण्यासाठी जागा आहे.




ह्याशिवाय अनेक मंदिरे आणि इमारती आहेत. सर्व अर्धवट नष्ट झाल्या आहेत.
ह्याचेही उत्खनन अजून पूर्ण झाले नाहीये.
ह्या परिसरात खूप वेळ फिरून सर्व काही नीट बघितले.
त्यानंतर आम्ही बसने बलरामपूर स्टेशनवर आलो.
येथे बुध्दिस्ट यात्रा संपली.

**दि. ११ नोव्हेंबर दिवस ८ वा**

सकाळी आग्रा स्टेशनवर उतरून बसने पुढे जाऊन ताजमहाल बघितला. नंतर पुन्हा ट्रेनमध्ये जेवण केले आणि रात्री साडेआठ वाजता सफदरजंग रेल्वे स्टेशनवर पोचलो. एकमेकांचा निरोप घेऊन सर्वजण आपापल्या घरी जायला निघाले. मी कारने निघून रात्री साडेबारा वाजता माझ्या घरी पोचले.

(समाप्त)

**- डॉ. मंजिरी मणेरीकर**